सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222

दूरध्वनी : 0253-2230580, 2230734, 2230118 फॅक्स : 2231716

संकेतस्थळ : http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

ज्ञानगंगा घरोघरी

परीक्षा व नोंदणी विभाग

जा.क्र. : पनिका/नोंदणी/2017/ दिनांक : 29.09.2017.

प्रति,

मा. विभागीय संचालक,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विभागीय केंद्र,

द्वारा - अमरावती/औरंगाबाद/मुबंई/नागपूर/नाशिक/पुणे/कोल्हापूर/नांदेड

**विषय : शैक्षणिक सत्र 2017-18 : सर्व शिक्षणक्रम ऑनलाईन प्रवेश मुदतीबाबत .....**

महोदय,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष 2017-18 साठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दिनांक 26.06.2017 पासून सुरू केलेली आहे हे आपणांस ज्ञात आहेच. शैक्षणिक सत्र 2017-18 ची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने होत आहे.

ऑनलाईन प्रवेश दिनांक 30.09.2017 रोजी संपुष्टात येत आहे. मात्र विलंब शुल्क कालावधीतील शेवटच्या दिवशी बँकेला लागोपाठ **3 दिवस सुट्टया** असल्यामुळे **(दिनांक 30.09.2017 आणि दिनांक 1 व 2 ऑक्टोबर 2017)** आणि सॉफ्टवेअर कंपनीला देखील सुट्टया असल्यामुळे विद्यार्थ्यांना अथवा अभ्यासकेंद्रांना शेवटच्या दिवशी प्रवेश करण्यासाठी अडचण येण्याची शक्यता आहे. **त्यामुळे विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांच्या हितासाठी अतिविलंब शुल्क रूपये 500 ची मुदत दिनांक 30.9.2017 ऐवजी 05.10.2017 पर्यत वाढविण्यात आलेली आहे.**

| नं. | नियोजित प्रवेश कालावधी | वाढीव प्रवेश कालावधी | शिक्षणक्रम | शुल्क तपशील |
|---|---|---|---|---|
| **01** | **02** | **03** | **04** | **05** |
| 01 | दि. 01.9.2017 ते 15.9.2017 | दि. 16.9.2017 ते **5.10.2017** | सर्व शिक्षणक्रम * | विलंब शुल्क 500/- |

* पूर्वतयारी, बी.एड. नियमित, बी.एड. स्पेशल, कृषी प्रथम वर्ष (मेरीट प्रवेश सोडून) शिक्षणक्रम सोडून इतर शिक्षणक्रमांना असणार आहे. द्वितीय वर्षासाठी उपरोक्तप्रमाणे प्रवेश सुरू असतील.

उपरोक्त तक्त्यातील **दिनांक 01 ते 05.10.2017 ह्या** कालावधीत विलंब शुल्कासह प्रवेश करावेत, तसेच विद्यार्थ्यांकडून विलंब शुल्क व्यतिरिक्त अधिकचे शुल्क ह्या कालावधीत घेऊ नये याबाबत आपापल्या अंतर्गत असलेल्या अभ्यासकेंद्रांना पत्र, ईमेल द्वारे कळविण्यात यावे. तसेच लवकरात लवकर विहित वेळेत प्रवेश करण्याबाबत अभ्यासकेंद्रांना प्रोत्साहित करावे. सहकार्याबद्दल धन्यवाद ! कळावे.

आपला विश्वासू,

**प्रा.(डॉ.) अर्जुन घाटुळे**

***परीक्षा नियंत्रक***

प्रत माहितीसाठी - 1. मा. कुलगुरू, यचममु विद्यापीठ,नाशिक 2. मा. कुलसचिव, यचममु विद्यापीठ, नाशिक, 3. मा. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, 4. मा. संचालक, सर्व विद्याशाखा, यचममुवि, नाशिक